## 9-वाहनांच्या बांधणी संबंधीचे नियम

### 1.आरसा-

प्रत्येक वाहनाला आत आणि बाहेर एक आरसा अशा प्रकारे बसविण्यात आला पाहिजे की चालकाला मागून येणारी वाहने स्पष्टपणॆ दिसू शकतील.

### 2.वाहनातील टेलिव्हिजन सेट किंवा व्हिडीऑ-

चालकाला दिसेल अशा प्रकारे वाहनाच्या डॅशबॊर्डवर कॊणताही टेलिव्हिजन सेट किंवा व्हिडीऑ ठेवता कामा नये.

### 3.धोकादायक रीतीने बाहेर आलेल्या गोष्टी-

वाहनावर कोणताही मानचिन्ह अशा कोणत्याही स्थितीत बसवण्यात येणार नाहीत,की जिथे ती वस्तू वाहनाशी टक्कर होईल त्या व्यक्तीवर आघात होण्याची शक्यता असेल.

### 4.स्प्रिंगा-

प्रत्येक वाहनाला आणि त्याच्या मार्फत ऒढून नेल्या जाणा-या प्रत्येक ट्रेलरला योग्य व पुरेशी स्प्रिंग व्यवस्थेची साधने बसविलेली पाहिजेत

### 5.मडग़ार्ड-

प्रत्येक वाहनाला चाकांच्या फिरण्यामुळे फेकला जाणारा चिखल किंवा पाणी व्यवहार्य असेल तेथवर झेलण्यासाठी मडग़ार्डची सोय केली पाहिजे.

### 6.लष्कर आणि पोलिस यांचे रंग,नोंदणी चिन्हे-

लष्कर आणि पोलिस यांचॆ वाहनांखेरीज इतर कोणतेही वाहन सामान्यपणे लष्कर आणि पोलिस वाहनासाठी घेण्यात येणार्या रंग संगतीपॆक्षा वेगळ्या रंगाने रंगवलेले असावे.इतर कोणत्याही वाहनांवर लष्कर आणि पोलिस यांचे नोंदणी चिन्ह प्रदर्शित करता कामा नये.

**7.सर्वसाधारण**

प्रत्येक लोकसेवा वाहन आणि त्याचे रंग काम,आसने,गाद्या इत्यादी साहित्य यांसह सर्व भाग स्वच्छ आणि सुस्थितीत ठेवले पाहिजेत. इंजिनची यंत्रणा व काम करणारे सर्व भाग खात्रीशीर काम देतील अशा स्थितीत ठेवले पाहिजेत.

8.बसण्यासाठी जागा

अ)प्रत्येक लोकसेवा वाहनामध्ये उभे उतारू म्हणून नेण्याची परवानगी असलेल्या उतारूं व्यतिरिक्त प्रत्येक उतारूसाठी पुरेशा आरामात बसता येइल यासाठी प्रत्येक आसनाच्या बाजूने पुढील आसनाच्या काटकॊनात किमान 381 मि.मि.इतकी जागा ठेवण्यात आली पाहिजे.

ब)जेव्हा आसने एकमेकांसमोर असतील,तेव्हा आसनांच्या पाठी दुस-या आसनाच्या पाठीपासून किमान 1372 मि.मि. अंतरावर असल्या पाहिजेत.

क)जेव्हा आसनांची तोंडे एकाच बाजूला असतात तेव्हा,पुढ़ील आसनाची पाठ व मागील आसनाची पुढ़ील बाजू यामधील अंतर किमान 660 मि.मि.असले पाहिजेत.

**9.**गँगवे-

प्रत्येक लोकसेवा वाहनामध्ये एका टोकापासून दुस-या टोकापर्यंत कमाल 686 मि.मि.गँगवे असला पाहिजे.

**10.**उंची-

प्रत्येक लोकसेवा वाहनामध्ये तळाच्या पृष्ठापासून छताच्या आतल्या भागापर्यंतची उंची किमान 1.75 मी. असली पाहिजे.

**11.**चालकाची बसण्याची जागा

कोणतेही वाहन,वाहनाच्या उजव्या बाजूने चालवण्यात यावे.

चालकाची पाठ टॅकवण्याची जागा स्टिअरिंग व्हीलपासून किमान 280मि.मि.असली पाहिजे.

**12.**दरवाजाची उंची

प्रत्येक लोकसेवा वाहनाचे प्रवेश करण्याचे किंवाबाहेर पडण्याचे दार किमान 540 मि.मि.असले पाहिजेत.

**13.**पकडण्याचा दांडा

प्रत्येक लोकसेवा वाहनाचे प्रवेश करण्याचे किंवाबाहेर पडण्याचे दाराजवळ प्रवाशांना मदत व्हावी म्हणून एक पकडण्याचा दांडा जोडण्यात यावा.

**14.**पाय-या

प्रत्येक लोकसेवा वाहनाचे प्रवेश करण्याचे किंवा बाहेर पडण्याचे दाराच्या सर्वात खालच्या पायरीचा पृष्ठभाग जमिनी पासून किमान 250 मि.मि.असला पाहिजे.

पाय-या किमान 230 मि.मि. रूंदीच्या असाव्यात.

**15.**प्रवाशांचे हवेपासून संरक्षण करणें**.**

वाहनाचे वरचे छत पक्के बसवलेले आणि जलविरोधक असेल अशाच प्रकारे वाहनांची बांधणी करण्यात आली पाहिजे.कोणत्याही वॆळी प्रवाशांच्या पुरेशा वायुविजनास अडथळा न आणता वा-यापासून प्रवाशांचे रक्षण होण्यासाटी आवाज न करणा-या काचेच्या सुयोग्य खिडक्या पुरवण्यात आल्या पाहिजेत.

**16.**अंतर्गत प्रकाश योजना

प्रत्येक लोकसेवा वाहनाच्या प्रवाशी भागात पुरेसा प्रकाश देतील असे चालकाला समोरचे पाहण्यास अडथळा न आणणारे असे विजेचे दिवे पुरवण्यात यावेत.

**17.**इंधन टाकी

प्रत्येक लोकसेवा वाहनाचे प्रवेश करण्याचे किंवा बाहेर पडण्याचे दाराच्या जागे पासून किमान 60से.मी. इंधन टाकी बसविण्यात यावी.

**18.**कार्बुरेटर

प्रत्येक लोकसेवा वाहनामध्ये कार्बुरेटर अशा प्रकारे बसवण्यात यावा की त्यातून इंधन गळाल्यास साठणार नाही.

**19.**अग्निशामक

प्रत्येक लोकसेवा वाहनामध्ये परिवहन प्राधिकरणाकडून विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा प्रकारचे नेहमी चालू शकण्याच्या स्थितीत असले पाहिजेत.

**20.**जादा चाक

प्रत्येक वाहनामध्ये नेहमी योग्य व चांगल्या स्थितीतले हवा भरलेले, वापरासाठी तयार असे टायर बसविलेले एक जादा चाक असावे. ते अशा रीतीने बसविलेले असावे की,सहजपणे काढून वाहनाला कोणत्याही चाकाच्या जागी बसविणे शक्य होईल.एक उपयुक्त जँक व चाक बद्लण्यासाठी आवश्यक अशी उपकरणॆ पूरविण्यात यावीत.

**21.**प्रथमोपचार पेटी

प्रत्येक वाहनामध्ये नेहमी योग्य व चांगल्या स्थितीतील भाजण्यावरची जखमांवरची औषधे,वेदनाशामक आणि व्रणोपचार सामग्री यांचा समावेश असणारी आयुक्त,अन्न व प्रशासन,महाराष्ट्र यांनी मान्यता दिलेली असली पाहिजे.

**22.**व्हील ट्रॅक

वाहनाच्या पुढच्या चाकांच्या मध्यवर्ती रेषेतील अंतर वाहनाच्या एकून रूंदीच्या किमान 69%असावे.

**23.**अडथळ्याचा ठोकळा***(***चॉक***)***

प्रत्येक जड वाहन उतारावरुन मागे घसरू नये म्हणून दोन पाचराच्या आकाराचे 30 से.मी.लांब,30 सॆ.मी.रूंद,254 से.मी.ऊंच आसावेत.त्याची एक बाजू शेवटी 45 अंशाचा कोन असलेल्या उताराची असावी.

---